आधुनिक विचारांचे

# वर्तमान

बीड । मंगळवार, १ जून २०२१ । वर्ष : ३
आपले वृत्तपत्र, आपला आवाज
अंक : ३२ । पाने : ४ । मूल्य २ ₹



अफलातून,
अजातशत्रू
व्यक्तिमत्व
वाचा पान ४ वर

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३,
मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# गुडन्यूज! कोरोना रुग्ण संख्येत घट

## मृत्यूदरही होतोय कमी; महाराष्ट्रासाठी शुभसंकेत

प्रतिनिधी

मुंबई : महाराष्ट्रासाठी गुडन्यूज असून कोरोना रूग्णसंख्येत सोमवारी मोठी घट झाली आहे. दरम्यान, मृत्यदरही कमी झाल्याने महाराष्ट्र राज्यासाठी हा शुभसंकेत मानला जात आहे. रूग्ण बरे होण्याचे प्रमाणही वाढले असल्याचे आरोग्य प्रशासनाने सांगितले आहे.


गेल्या काही दिवसांपासून राज्यातील रोजच्या नव्या कोरोना बाधित रूग्णांच्या संख्येत घसरण होत असून सोमवारी आढळलेल्या नव्या रूग्णांचा आकडा १५ हजारांच्या जवळपास घसरला आहे. या बरोबरच बरे होणाऱ्या रूग्णांची संख्या सोमवारी निदान झालेल्या रूग्णांच्या संख्येच्या दुपटीहून अधिक आहे. तसेच सोमवारी दिवसभरात मृत्यूमुखी पडलेल्या रूग्णांची संख्याही खाली घसरली आहे. यामुळे राज्याला मोठा दिलासा मिळत असल्याचे चित्र आहे. गेल्या २४ तासांत राज्यात १५ हजार ०७७ इतक्या नव्या कोरोना बाधित रूग्णांचे निदान झाले आहे. तर सोमवारी एकूण ३३ हजार रूग्ण बरे होऊन घरी गेले आहेत. याबरोबरच राज्यातील सक्रिय रूग्णांची संख्या देखील कमी होत असून ती सोमवारी लाख ५३ हजार ३६७ वर आली आहे.

राज्यात सोमवारी एकूण १८४ कोरोना बाधित रूग्णांचा मृत्यू झाला आहे. या बरोबर सध्या राज्यातील मृत्यूदर १.६६ टक्के इतका आहे. याबरोबर राज्यात सोमवारी ३३ हजार रूग्ण बरे होऊन घरी गेले आहेत, तर आतापर्यत एकूण ५३ लाख ९५ हजार ३७० रूग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रूग्ण बरे होण्याचे प्रमाण ९३.८८ टक्क्यांवर पोहोचले आहे.राज्यातील ॲक्टिव्ह रूग्णांची संख्या २ लाख ५३ हजार ३६७ इतकी झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांमधील सक्रिय रूग्णांच्या संख्येतही घट होताना दिसत आहे. राज्यातील सक्रिय रूग्णांचा जिल्हानिहाय विचार करता पुणे जिल्ह्यात सक्रिय रूग्णांची संख्या सर्वाधिक असली तरी ती देखील घटत आहे. पुण्यात एकूण ३६ हजार ५६३ इतके रूग्ण आहेत. मुंबई पालिका हद्दीत हा आकडा २४ हजार ८५० इतका आहे. ठाणे जिल्ह्यात सध्या १८ हजार ४८४ रूग्णांवर उपचार सुरू आहेत. तर कोल्हापुरात सक्रिय रूग्णांची संख्या १८ हजार ५५७ इतकी आहे. नागपूर जिल्ह्यात ही संख्या ११ हजार २५२ इतकी झाली आहे.

नाशिकमध्ये सक्रिय रूग्णांची संख्या ९ हजार ६३४ इतकी आहे. या बरोबरच अहमदनगरमध्ये १० हजार ८०३ इतकी आहे. औरंगाबादमध्ये ४ हजार १०२, नांदेडमध्ये ही संख्या २ हजार १६२ इतकी आहे. जळगावमध्ये ४ हजार ७६४, तसेच तर रायगडमध्ये एकूण ४ हजार ७२४ इतके सक्रिय रूग्ण आहेत. अमरावतीत ही संख्या ५ हजार ११०, तर, राज्यात सर्वात जास्त सक्रिय रुग्णांची संख्या पुण्यात आहे. तर, सर्वात कमी सक्रिय रूग्णांची संख्या गोंदिया जिल्ह्यात आहे. येथे सक्रिय रूग्णांची संख्या ७९९ इतकी आहे.

**१८ लाख ७० हजार होमकोरोंटाईन**

**आतापर्यंत तपासण्यात आलेल्या ३ कोटी ५० लाख ५५ हजार ०५४ प्रयोगशाळा नमुन्यांपैकी ५७ लाख ४६ हजार ८९२ (१६.३९ टक्के) नमुने पॉझिटिव्ह आले आहेत. सध्या राज्यात १८ लाख ७० हजार ३०४ व्यक्ती होमकोरोंटाईनमध्ये आहेत. तर, १० हजार ७४३ व्यक्ती संस्थात्मक कोरोंटाईनमध्ये आहेत.**



## 'मानवलोक'च्या सेंद्रिय शेती योजनेसाठी धारूर तालुक्याची निवड



प्रतिनिधी

धारूर : 'मानवलोक'च्या सेंद्रिय शेती कार्यक्रमात कापूस पिकाचा समावेश आहे. यासाठी धारूर तालुक्यातील गावांना मुख्यत्वे यात समाविष्ट करून घेण्यात येणार असल्याचे मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांनी सांगितले. वाढता उत्पादन खर्च व असुरक्षित शेतमाल बाजार या प्रमुख शेती संकटातून बाहेर काढण्यासाठी शेतकऱ्यांसाठी विशेष सेंद्रिय शेती कार्यक्रम मानवलोकमार्फत राबवण्यात येत आहे. यात विशेषत: कापूस पिकासाठी धारूर तालुक्यातील गावांना समाविष्ट करण्यात येणार आहे.

शेतीच्या वाटाला संकटे पूजलेली आहेतच. यातून मार्ग काढत पिकेल ते विकणार का, याची चिंता करण्यापेक्षा खात्रीची विक्री व्यवस्था, त्यात अधिकचे दोन पैसे सतत कसे मिळतील हे आपण शेतकऱ्यांनी पहायला हवे. वैयक्तिक एकटा शेतकरी हे करू शकणार नाही. मात्र एकत्र येत आपण नक्कीच हे साध्य करू शकतो. यासाठी मानवलोकने सेंद्रिय शेती कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी आखला आहे. खरिपात आपण घेत असलेली सोयाबीन, कापूस, तूर ही पिके तर रब्बीत हरभरा, गहू, ज्वारी ही पिके यात घ्यायची आहेत.

### लॉकडाऊनमध्ये वाढ; किराणा दुकानांना परवानगी

बीड : दैनंदिन रुग्णसंख्या पाचशेच्या घरात असल्याने बीड जिल्ह्यातील लॉकडाऊन १५ जून पर्यंत वाढवण्यात आला. तर सकाळी ७ ते ११ या वेळेत किराणा दुकाने सुरु ठेवण्यास जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली आहे. यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळाला आहे.

## फास्टट्रॅकन्यूज

### मराठा समाजाला १० टक्के शैक्षणिक आरक्षण

मुंबई : महाविकास आघाडी सरकारने राज्यातील मराठा विद्यार्थी आणि उमेदवारांना १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणाचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशात १०% आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. त्याबरोबर सरळ सेवा भरतीतही मराठा उमेदवार आरक्षणाचा १०% लाभ घेऊ शकणार आहेत. सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केल्यानंतर मराठा समाजाला दिलासा देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे. दरम्यान, मराठा आरक्षण रद्द झाल्यावर मराठा समाजाला ईडब्ल्यूएस आरक्षण लाभ देण्याचा निर्णय सरकारने घेतला असून तसा अध्यादेश राज्य सरकारने जारी केला आहे.

### लवुळ येथील शेतकऱ्यास जीवे मारण्याची धमकी

माजलगाव : तालुक्यातील लवुळ क्र.२ येथील शेतकरी कल्याण बाबुराव शिंदे यांना व त्यांच्या कुटुंबियांना जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकांसह वडवणी पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली आहे. तक्रारीत म्हटल्याप्रमाणे माजलगाव तालुक्यातील लवुळ क्र.२ येथील शेतकरी कल्याण शिंदे यांची गट क्रमांक.१३९ मध्ये शेती आहे. त्यांना शेजारील गुंड प्रवृत्तीचे लोक सतत त्रास देतात. बांध कोरणे असे विविध उपद्व्याप करत असतात. या प्रकरणी शिंदे यांनी वेळोवेळी अर्ज दिलेले आहेत. तरी आपणास न्याय देण्यात यावा अशी मागणी शिंदे यांनी निवेदनात केली आहे.

### जिल्हा बँकेकडून शेतकऱ्यांना ४ कोटींचे पीककर्ज



बीड : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने २९ मेअखेर खरीप हंगामात ६१९ सभासदांना ४ कोटी १३ लाख रूपयांचे पीककर्ज वाटप केले आहे. बीड जिल्हा बँकेला २०२१-२२ च्या खरीप हंगामात २०८ कोटी रुपये, तर रब्बी हंगामात ५२ कोटी असे २६० कोटी रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. शासनाने दिलेले खरीप पीक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पालकमंत्र्यांच्या निर्देशानुसार बीड जिल्हा बँक पूर्ण करणार असून, पीक कर्जासाठी सातबारा व इतर कागदपत्रांसाठी आता तलाठ्याकडे जाण्याची आवश्यकता राहणार नाही, अशी माहिती प्रशासकीय मंडळाचे अध्यक्ष अविनाश पाठक यांनी दिली.

### अखेर अपहरण झालेल्या मुलीचा शोध लागला

माजलगाव : तालुक्यातील दिंद्रुड पोलीस हद्दीत एका अल्पवयीन मुलीची अपहरण झाल्याची तक्रार तिच्या पालकांनी दि.२५ एप्रिल रोजी दिली होती. तब्बल एक महिना सहा दिवसानंतर त्या मुलीचा शोध घेण्यात दिंद्रुड पोलिसांना अखेर यश आले आहे. त्या अल्पवयीन मुलीस दिंद्रुड पोलिसांनी नांदेड जिल्ह्यातील मुखेड येथून ताब्यात घेतले आहे. याच प्रकरणात काही दिवसांपूर्वी पोलिसांनी मुलीचा शोध घेण्यासाठी ४० हजार रुपये मागितल्याची तक्रार तिच्या वडिलांनी पोलीस अधीक्षकांकडे केली होती.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !









संपादकीय

# दहावी परीक्षा, प्रश्न अनेक

शैक्षणिक जीवनातील दहावीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ही परीक्षा रद्द केल्याने अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. दहावीची परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. दहावीत किती गुण मिळतात, त्यावर त्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याची दिशा ठरवली जाते. दहावीची परीक्षा कधी होणार आणि त्याचा निकाल कधी लागणार, याची उत्सुकता दरवर्षी लक्षावधी कुटुंबात असते. पाल्य नववीमध्ये असतानाच त्याच्या पालकांना दहावीचे वेध लागतात, आजही अनेक कुटुंबांमध्ये घरातील मुलगा अथवा मुलगी दहावीच्या वर्षाला आहे म्हणून घरात टीव्ही बंद ठेवला जातो, अनेक घरात मोबाईल फोन मुलांपासून दूर ठेवला जातो, अनेक पालक स्वतःहून फॅमिली आणि मित्र नातेवाइकांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपपासून लांब राहतात. गुडमॉर्निंग, गुडनाईट किंवा फालतू आणि फॉरवर्डेड मेसेजपासून पालक स्वतः दूर राहतात. घरात आपल्या पाल्याचे लक्ष अभ्यासावरून विचलीत होऊ नये, याची काटेकोर काळजी घेणारे हजारो पालक आहेत. दहावीच्या परीक्षेच्या अगोदर चार महिने निव्वळ प्रश्नपत्रिका सोडविण्याच्या सरावावर अनेक घरात कटाक्ष असतो. दहावीची परीक्षा हे विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे प्रवेशद्वार आहे; असे असताना महाराष्ट्रात राज्य शालांत परीक्षा मंडळाने ही परीक्षा रद्द करण्याचा निर्णयच का घेतला, याचे समाधानकारक उत्तर कोणाला मिळालेले नाही. एसएससी बोर्डाच्या या निर्णयाने लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे, हे लक्षात आणून देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य धनंजय कुलकर्णी यांनी अॅड.उदय वारूंजीकर यांच्यामार्फत मुंबई उच्च न्यायालयात जनहीत याचिका दाखल केली आहे. न्या. काथावाला व न्या. सुरेंद्र तावडे यांच्या खंडपीठाने, मुळात परीक्षा रद्द का केलीत? असा प्रश्न विचारून सरकारला अक्षरशः धारेवर धरले. केवळ कोरोनाचे कारण दाखवून सरकार आपली जबाबदारी झटकू पाहत आहे, हेच दिसून आले. दहावीची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय तुम्ही मागे घेता की, आम्ही रद्द करू, अशा शब्दांत न्यायालयाने सरकारला खडसावले तेव्हा कुठे सरकारचे डोळे उघडले असावेत. दहावीची परीक्षा रद्द केल्याचे शालांत परीक्षा मंडळाने जाहीर केले, मग या विद्यार्थ्यांचे मूल्यमापन कसे होणार आहे, हा खरा कळीचा मुद्दा आहे. दहावीच्या परीक्षेला सामोरे जाणारे १६ लाख विद्यार्थी, त्यांचे पालक, नातेवाईक, मित्र मंडळी, परिचित, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अशी राज्यातील किमान एक-दीड कोटी जनता अस्वस्थ आहे किंवा तणावाखाली आहे. कोरोनाच्या संकटाने राज्याला वेढले आहे, आता ब्लॅक फंगसची त्यात आणखी भर पडली आहे, लॉकडाऊनमुळे तर राज्याच्या दैनंदिन जीवनाची चाके ठप्प झाली आहेत. लॉकडाऊन उठणार की नाही, याची जशी चिंता कोट्यवधी जनतेला आहे, तशीच चिंता, दहावीची परीक्षा होणार की नाही आणि मूल्यमापन कसे होणार, याबाबत सोळा लाख पाल्यांच्या घराघरात आणि राज्यातील २६ हजार शाळांमध्ये आहे. राज्यात आठवीपर्यंत कोणाला नापास करू नका, असे आदेशच आहेत. गेल्या वर्षी नववीच्या परीक्षा झाल्याच नाहीत आणि यंदा दहावीच्या परीक्षा कोरोनाची ढाल पुढे करून सरकारने रद्द करून टाकल्या. ज्या राज्यात दहावीपर्यंत मुलांच्या गुणवत्तेचे मूल्यमापनच होत नसेल, तर त्यांचे भवितव्य काय? त्यांचे करिअर काय? त्यांनी काय भविष्यात रस्त्यावर भाजी-फळे विकायची की, वडापाव? इडली डोसाच्या गाड्या लावून उदरनिर्वाह करायचा का? राज्यातील नव्या पिढीचे भविष्य बरबाद करण्याचे अधिकार ठाकरे सरकारला कोणी दिले? चौदा लाख मुले असलेल्या बारावीची परीक्षा होणार आहे, मग सोळा लाख मुले असलेल्या दहावीची परीक्षा सरकार का घेऊ शकत नाही, असा न्यायालयानेच बिनतोड सवाल विचारला आहे. सीबीएसईने दहावीची परीक्षा रद्द केली, पण त्या बोर्डाच्या नववीपर्यंतच्या मुलांचे मूल्यमापन झालेले आहे, हे कसे विसरता येईल? महाराष्ट्रात शालेय विद्यार्थ्यांच्या मूल्यमापनाचा आनंदी आनंदच आहे. परीक्षाच नसेल तर मुलांचे बौद्धिक मूल्यमापन होणार नाही, कोणती शाळा चांगली व कोणती सुमार हे समजणार नाही, शाळेतील शिक्षकांचाही दर्जा कळणार नाही. परीक्षा न घेता सोळा लाख विद्यार्थी उत्तीर्ण होणार असतील, तर त्यांच्या निकालपत्रावर कोरोना ईअरचा शिक्का आणि शेजारी मुख्यमंत्र्यांचा फोटो छापणार काय?

दहावीची परीक्षा रद्द झाली म्हणून असंख्य सुमार विद्यार्थांना आनंद झाला असेल. त्यांचे पालकही खूश झाले असतील. चला सुटलो, अशी त्यांची भावना असेल. परीक्षा न देताच पुढील वर्गात प्रवेश, अशी मानसिकता तयार करण्याने त्या विद्यार्थ्यांचे करिअर आपण उद्ध्वस्त करीत आहे, हे शिक्षणमंत्री व मुख्यमंत्र्यांच्या लक्षात येत नाही काय? सर्वात जीव महत्त्वाचा म्हणून लॉकडाऊन बोकांडी मारला आहेच, कोट्यवधी जनता मुकी बिचारी कुणी हाका रे' असे जीवन जगत आहेच. त्यात दहावीची परीक्षा रद्द करून एका पिढीच्या भवितव्यावर धोंडा मारण्याचे काम सरकारने केले आहे. जून महिन्यात परीक्षा होणार हे गृहीत धरून दहावीच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका तयार आहेत, उत्तर पत्रिका तयार आहेत. मार्ग कसा काढायचा, परीक्षा कशी घ्यायची हे सरकारने ठरवायचे आहे. कोणाच्या सांगण्यावरून व कोणाच्या इच्छेवरून दहावीची परीक्षा रद्द करण्याचा निर्णय झाला, हे जनतेला समजले पाहिजे.

# सोशल मीडियाच्या प्रायव्हसीचे गौडबंगाल

**केंद्र सरकारने सोशल मीडिया कंपन्यांसाठी एक नियमावली जाहीर केलीय. कंपन्यांनी अपेक्षित प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे हे सोशल प्लॅटफॉर्म बंद होतील अशी चर्चा सुरू झाली. या नियमांच्या आडून सरकार कंपन्यांवर दबाव टाकत सर्वसामान्य लोकांच्या अभिव्यक्तीवर बंधनं आणत असल्याचे आरोपही होतायत. सरकार मात्र हे सगळं सर्वसामान्यांच्या हिताचं असल्याचं म्हणतंय.**




विशेष

**अक्षय शारदा शरद**

फेसबुक बंद होणार असल्याची बातमी अचानक वायरल झाली. सोशल मीडियातून वेगवेगळ्या चर्चांना उधाण आलं. ट्विटर आणि केंद्र सरकारमधे सध्या संघर्ष सुरू आहे. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष असताना असाच संघर्ष तिथंही पहायला मिळाला होता. थोड्या बहुत फरकानं हे जगभर चालूच आहे. हे सोशल प्लॅटफॉर्म आपल्या ताब्यात ठेवायचा प्रयत्न सरकारं करताना दिसतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून लाखो लोक व्यक्त होतात. व्यक्त होण्याचं एक प्रभावी माध्यम म्हणून त्याकडे पाहिलं जातं. त्यातून सरकारच्या एखाद्या धोरणाविरोधी चळवळ उभी राहू शकते. त्याचवेळी या सोशल प्लॅटफॉर्मचा वापर करून सरकारच्या कारभाराचे वाभाडे काढता येतात. सरकारला त्याच्या चुका दाखवता येतात. या सोशल मीडिया प्लॅटफॉर्ममुळे आपण जगभर पोचतो. एखाद्या घटनेवर मत व्यक्त करू शकतो. कोरोनाच्या पहिल्या आणि दुसऱ्या लाटेची परिस्थिती केंद्र सरकारनं ज्या पद्धतीने हाताळलीय त्यावरून नाराजीचा सूर वाढतोय. थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य केलं जातंय. त्यांच्या कारभारावर टीका होतेय. आंतरराष्ट्रीय मीडिया या सगळ्याची दखल घेतोय. सरकार आणि पर्यायाने नरेंद्र मोदींच्या प्रतिमेला धक्का पोचतोय. त्यामुळे लोकांच्या लिहिण्या बोलण्यावर आपलं नियंत्रण असावं असं केंद्र सरकारला वाटतंय. त्यामुळेच केंद्र सरकारने सोशल मीडिया कंपन्यांसाठी नियम जाहीर केले.

ट्विटरला नोटीस आणि चर्चेला बळ

२५ फेब्रुवारीला भारताच्या माहिती आणि तंत्रज्ञान खात्याने सोशल मीडियासाठी एक नियमावली जाहीर केली होती. भारतातल्या सोशल मीडिया कंपन्यांसाठी त्यात नवे नियम होते. त्यासाठी त्यांना तीन महिन्यांचा वेळही देण्यात आला होता. या कंपन्यांकडून अपेक्षित प्रतिसाद आला नाही. त्यामुळे हे सोशल प्लॅटफॉर्म बंद होतील अशी चर्चा सुरू झाली. 'कोविड टूलकिट'वरून भाजप आणि काँग्रेसमधे आरोप प्रत्यारोप होतायत. राजकीय वातावरण तापलंय. अशातच भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ता संबित पात्रा यांच्या एका ट्विटमधे फेरफार असल्याचा आरोप ट्विटरने केला होता. त्यांच्यावर कारवाईची मागणी केली जात होती. दिल्ली पोलिसांनी गुरुग्राम इथल्या ट्विटरच्या कार्यालयात अचानक जात त्यांना नोटीस दिली. त्यामुळे सोशल प्लॅटफॉर्म बंद व्हायच्या चर्चेला बळ मिळालं. सरकारने यावर आपलं अधिकृत निवेदन दिलेलं नाही. म्हणजे नियमावली जाहीर केल्यानंतर तीन महिने होऊन गेलेत. अशावेळी या सोशल मीडिया कंपन्यांवर सरकार काही कारवाई करणार का किंवा कसं हे सरकारने अद्याप स्पष्ट केलेलं नाही.

अशी असेल नवी नियमावली

भारतातल्या न्यूज वेबसाईट, सोशल मीडिया आणि ओटीटी प्लॅटफॉर्मसाठी नियमावली जाहीर करण्याची ही पहिलीच वेळ असल्याचं म्हटलं जातंय. सर्वसामान्य लोकांना इंटरनेटवर अधिक सक्षम करण्याचा हेतू यामागे आहे असं सरकारचं स्पष्ट केलंय. भारताचं ऐक्य, सुरक्षा, अखंडता, सार्वभौमत्व किंवा मित्र राष्ट्राच्या संबंधांना धोका पोचवणारी कोणतीही पोस्ट टाकता येणार नाही. एखाद्या गुन्ह्याला प्रवृत्त करेल, सामाजिक स्वास्थ्य बिघडेल असं काहीही टाकता येणार नाही. कुणाच्याही खाजगी आयुष्यात हस्तक्षेप करणं, अश्लील माहिती पसरवणं अशी कोणतीही गोष्ट या सोशल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून करता येणार नसल्याचं सरकारने म्हटलंय. सोशल मीडिया कंपनीकडे एखादी तक्रार आली तर त्यांना ती २४ तासांमधे दाखल करून घ्यावी लागेल. तसंच पुढच्या १५ दिवसांमधे त्यावर कारवाई करावी लागेल. या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी एक अधिकारी तर या सगळ्याचं पालन होतंय की नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी भारतात अजून एका अधिकाऱ्याची नियुक्ती या कंपन्यांनी करावी असं सरकारने म्हटलंय. तर न्यायालय किंवा सरकारी संस्थेनं एखादी माहिती काढून टाकायची सूचना केली तर पुढच्या ३६ तासांमधे ती हटवावी लागेल. गरज पडली तर संबंधित संस्थेला पुढच्या ७२ तासांमधे मदत करावी लागेल.

कडक शिक्षेची तरतूदही

ट्विटर, फेसबुक अशा सोशल मीडिया कंपन्यांना प्रत्येक महिन्याला एक रिपोर्ट तयार करावा लागेल. या कंपन्यांकडे नेमक्या कोणत्या तक्रारी आल्या, त्यातल्या किती तक्रारींवर कारवाई झाली हे सांगावं लागेल. तसंच कोणती माहिती कंपन्यांनी प्लॅटफॉर्मवरून हटवलीय याची माहितीही सरकारला द्यावी लागेल. एखादी वादग्रस्त पोस्ट कुणी टाकलीय याची माहिती सरकारी संस्थांना देणं बंधनकारक आहे. प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाला या नियमावलीचं पालन करावंच लागेल. त्यासाठी माहिती, सूचना आणि तंत्रज्ञान खात्याकडून एक समिती नेमली जाईल. नियमांचं पालन होतंय की नाही यावर ती लक्ष ठेवेल. नेटफ्लिक्स, अमेजॉन अशा ओटीटी प्लॅटफॉर्मना त्यांच्या कार्यक्रमांची वयानुसार पाच भागांमधे वर्गवारी करावी लागेल. अश्लील गोष्टी मुलांपर्यंत पोचवता येणार नाहीत. नियमांचं पालन केलं नाही तर अशांवर कारवाई केली जाईल. त्यासाठी कमीतकमी ३ ते जास्तीत जास्त ७ वर्षांपर्यंत जेलची हवा खावी लागेल. तसंच २ ते १० लाखांपर्यंतचा दंड भरावा लागेल. तशी तरतूद या नियमावलीत सरकारने जाहीर केलीय. सोशल मीडिया कंपन्यांनी नियमावली पाळली नाही तर त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई केली जाईल.

आपल्या मेसेज वरही सरकारचं लक्ष

व्हाट्सएप, सिग्नल, टेलिग्राम ही मेसेज पोचवणारी माध्यमं आहेत. आपल्या चॅटिंगसाठी हा एक उत्तम पर्याय आहे. पण त्यांचाही आता यात समावेश करण्यात आलाय. या प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून रोज असंख्य मेसेज फॉरवर्ड केले जातात. हे मेसेज नेमके कुणी फॉरवर्ड केलेत त्या व्यक्तीवरही सोशल मीडिया कंपन्यांना लक्ष ठेवावं लागेल असं सरकार म्हणतंय. फेसबुकनं या नियमावलीतल्या काही मुद्द्यांवर चर्चा करायची तयारी दाखवलीय. ट्विटरकडून मात्र अधिकृत कोणतंही वक्तव्य आलेलं नाहीय. मुळात असे नियम जाहीर करून व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात सरकार डोकावण्याचा प्रयत्न करत असल्याची टीका सोशल मीडियातून होतेय. त्यातून अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर अनेक नवी संकटं उभी राहतील. सरकारच्या वेगवेगळ्या संस्थांना यात थेट चौकशी करता येईल. त्यामुळे त्यांच्या विश्वासार्हतेचं काय असाही प्रश्न यानिमित्ताने उभा राहिलाय. आपल्याकडच्या इडी, सीबीआय अशा संस्था सरकारच्या तालावर नाचत असल्याचं चित्र असताना त्यांची एण्ट्री झाली तर निष्पक्ष चौकशी केल्या जातील असं म्हणणं फार धाडसाचं होईल.

# चिरंतन बुध्द तत्वज्ञान



**आपल्या अस्तित्वाबद्दलची जवळची गोष्ट म्हणजे मृत्यू. कोरोनाच्या काळात तर आपण अनेक मृत्यू अनुभवतोय. मृत्यू अटळ आहे, तो निश्चित आहे आणि तो कोणत्याही क्षणी येऊ शकतो, असं एका बुद्ध वचनात सांगितलंय. बौद्ध धम्मात मृत्यूविषयी वास्तववादी तत्त्वज्ञान मांडलंय. मृत्यू जागरूकता आणि मृत्यू साक्षरता हे बौद्ध धम्माचं खास वैशिष्ट्य बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने वर्तमानाच्या वाचकांसाठी हा विशेष लेख.**

संस्कृती

**डॉ.रविंद्र श्रावस्ती**

कोरोनाच्या लाटेनं जगातल्या अनेक महान व्यक्तींबरोबरच सर्वसामान्य लोकही मृत्यूमुखी पडतायत. गरीब मरतायत तसंच प्रचंड पैसा हाती असूनही बेड, ऑक्सिजन उपलब्ध नसल्यामुळे श्रीमंत लोकही मरतायत. सगळेच हवालदिल झालेत. उगवणारी सकाळ असो किंवा रणरणती दुपार किंवा अगदी रात्रीची करूण शांतता असू दे. मृत्यूच्या बातम्या लोकांच्या मनात भीती पसरवतायत. अशा कठीण काळात बौद्ध साहित्यातलं मृत्यूविषयक चिंतन निराश मनाला उभारी देणारं आहे. मृत्यू माणसाने निर्मिलेली गोष्ट. त्यात नैसर्गिक असं काहीच नाहीच या आशयाचं कवी वाय.बी.यिटस् यांचं 'मृत्यू माणसाने बनवलाय' हे वाक्य फारच उद्बोधक आहे. याचा अर्थ आजचं मृत्यूबाबतचं मत मानवनिर्मित आहे, असा होतो. मृत्यूविषयक नैसर्गिक गोष्टींची स्पष्टता आपल्याला नाही. बौध्द धम्मातल्या मृत्यू विषयीच्या संकल्पना मात्र अगदी वेगळ्या आणि विज्ञानाला सुसंगत आहेत. आज बुद्ध पोर्णिमेच्या दिवशी हे मांडणं महत्त्वाचंय.

मृत्यू सुंदर आहे?

धम्मात मृत्यूला मृत्यू म्हटलं जात नाही. तर त्याला परिनिर्वाण' असा शब्द दिलाय. हे परिनिर्वाण मृत्यूच्या संकल्पनेसारखं अजिबात नाही. मृत्यू विषयीचं आजचं मत ईश्वरवादी लोकांनी आणि पुरोहितांनी धर्मग्रंथांत लिहून आपल्या मनावर बिंबवलंय. त्याचा फार विपर्यासही झालाय. त्यांच्या मते, आपलं पृथ्वीवरचं आयुष्य हे खरं जीवन नाही. आपलं मृत्यूनंतरचं जगणं हे चिरंतन, अमर आहे. असं जीवन मिळवण्यासाठी आपण दानधर्म, तीर्थ पर्यटन, व्रतवैकल्यं आणि देवपुजा यासाठी पृथ्वीवरचं आयुष्य वापरलं पाहिजे. बौद्ध विचारधारेत मात्र अगदी विरुद्ध दृष्टिकोन सांगितलाय. पृथ्वीवरचं जीवन हेच खरं आणि ते सुंदर करण्यासाठी प्रत्येकाने झटलं पाहिजे, असं बौद्ध तत्त्वज्ञान सांगतं. बौद्धांच्या मते, जन्म सुंदर आहे. आसक्तीमुक्त जीवन जगून, आयुष्य पूर्णत्वाला नेऊन, आपण कृतार्थ जीवन जगू शकलो तर येणारा मृत्यूही सुंदर असतो. जन्म सुखकर आहे! मृत्यू सुंदर आहे!' हीसुद्धा बुद्ध वचनच आहेत. या दोन्ही वचनात भरपूर भावार्थ दडलाय. आपण अस्तित्वात येतो ते जन्मामुळे. आपण अस्तित्वातून विलुप्त होतो तो परिनिर्वाणाच्या माध्यमातून. जन्म सुखकर, आनंददायी हे ठीक आहे. पण परिनिर्वाण सुंदर कसं? असा प्रश्न आपल्याला पडू शकतो. परिनिर्वाण सुंदर आहे!' हे वचन बुद्धांनी स्वतःच्या परिनिर्वाणवेळी उच्चारलं होतं. महापरिनिर्वाण सुक्तात त्याचा उल्लेख आलाय. आसक्तीमुक्त, करूणामय, मुक्त हृदय लाभलेली, कृतार्थ आयुष्य जगलेली, आयुष्यात परिपुर्णता मिळवलेली बुद्धांसारखी महासुंदर माणसंच असं म्हणू शकतात.

मृत्यूचं सौंदर्यशास्त्र

परिनिर्वाण हे परिपूर्ण आयुष्य जगलेल्या, आपलं आयुष्य अनेक बाजूंनी सुंदर करणाऱ्या थोर माणसालाच सुंदर वाटतं. सामान्यांना नाही. दुष्टांना तर तसं अजिबात वाटणार नाही, कितीही आयुष्य जगूनही, आयुष्याचे सगळे भोग भोगूनही काही माणसं अतृप्तच राहतात. अशी आसक्तीत अडकलेली माणसं मृत्यूला नाखुशीनेच सामोरी जाणार. दुसऱ्यांचे श्रम शोषून जगणारे दुष्ट आयुष्य, दोषपूर्ण जीवन जगतात. त्यांना समोर मृत्यू दिसला की दुःख होणारच. आपण अतिशय वाईट आयुष्य जगलो, लोकांना अतोनात त्रास दिला याची बोच लागून अगदी दुःखी मनानं ते मृत्यूच्या भक्षस्थानी पडतात. अशा लोकांचे मृत्यू सुंदर कसे होतील? जन्म सुंदर आणि परिनिर्वाणही सुंदर हा दृष्टिकोन तेव्हाच येतो जेव्हा या दोन अवस्थांच्या मधे असलेलं आपलं आयुष्य सुंदर असतं. खरंतर, हे आयुष्य कुरूप म्हणावं असंच असतं. ते दुःखांनी भरलेलं असतं. पण त्याला जाणीवपूर्वक आणि प्रयत्नाने सुंदर करायचं अशी जाणीव निर्माण होणं, हीच मानवी सुंदरता आहे. त्यातच खरी उत्कटता आहे. जन्म आणि मृत्यू यामधलं जगणं सुंदर करण्यासाठी शिस्तबद्धपणे, नाजूकपणे झटावं लागतं. हे जग सुंदर करण्यासाठी झटलं पाहिजे, हे सांगणारी विचारधारा म्हणजे बौद्ध विचारधारा. या जाणिवेत, या सम्यक भानात मृत्यूचं सौंदर्यशास्त्र लपलंय. ते शोधणं, घडवणं आणि तृप्त मनाने या जगाचा निरोप घेणं ही सुंदरताच आहे.

परिनिर्वाण म्हणजे रूपांतरण

बौद्ध असं मानतात की, चार भौतिक स्कंध आणि एक चित्त स्कंध यांचं एकत्र येणं म्हणजे एखाद्या जीवाच्या अस्तित्वाचा जन्म होणं. तर त्या एकत्रित स्कंधांचं एकमेकांपासून विलग होणं म्हणजे परिनिर्वाण. परिनिर्वाणात सगळंच नष्ट होत नाही. परिनिर्वाणानंतर आपल्या अस्तित्वाचे भौतिक घटक सृष्टीच्या भौतिक घटकामधे मिसळतात आणि चित्ताचे घटक त्यांच्या चैतसिक घटकात, चैतन्याला जाऊन मिळतात. याचा अर्थ ते नष्ट होत नाहीत. तर फक्त रूपांतरित होतात. परिनिर्वाणानंतर काही कालांतराने आपलं अस्तित्व नजरेआड होतं. पण आपलं अस्तित्व ज्या घटकांमुळे अस्तित्वात येतं ते मात्र नष्ट होत नाही. ईश्वरवादी विचारधारा आपल्या अस्तित्वासाठी ईश्वर आणि आत्म्याची आवश्यकता मान्य करतात. त्याशिवाय जन्म आणि मृत्यू या गोष्टी शक्य नाहीत, असं त्यांचं म्हणणं असतं. पण बौद्ध विचारधारा ईश्वर आणि आत्म्याचं अस्तित्वच नाकारतात. त्यामुळे बौद्ध विचारसरणीत अमर, चिरंतन, अविनाशी असा आत्मा नाही. तिथं आत्म्याचं ईश्वराशी मिलन होत नाही. त्यामुळे आत्म्याची मुक्ती करायला तिथं काहीच कर्मकांड लागत नाही. ईश्वर नाकारला असल्याने ईश्वर पूजा, आराधना, तिर्थयात्रा, व्रतवैकल्यं असं काहीच इथं करायला लागत नाही.

युद्धातले कुरूप मृत्यू

जन्म आणि मृत्यूच्या मधलं जीवन सुंदर करण्यासाठी झटलं पाहिजे ही विचारधारा आणि त्यावर आधारित आचारसंहिता ही बौद्धांनी या जगाला दिलेली सर्वोत्तम देणगी आहे. बौद्ध मृत्यूनंतरचं जीवन मानत नाहीत. या पृथ्वीवरचं आपलं जीवन हे खरं जीवन आहे. हे जीवन दुःखाने भरलंय. या जगात असलेलं दुःख माणसामुळेच तयार झालंय. तसंच ते सृष्टीमुळे, समष्टीमुळे आणि समाजामुळेही निर्माण झालंय. त्यामुळे हे दुःख नष्ट करायला एकटा व्यक्ती पुरेसा नाही तर त्यासाठी सगळ्या समाजाने झटलं पाहिजे.

याच न्यायाने मृत्यूचं कारण स्वतः व्यक्तीही असू शकते. किंवा समाजाने निर्माण केलेल्या सदोष व्यवस्थेमुळे किंवा राज्यव्यवस्थेच्या प्रणालीमुळेही मृत्यू होऊ शकतो. लोकांचे अवेळी, अकाली मृत्यू होऊ नयेत म्हणून प्रत्येक व्यक्तीने, समाजाने, राज्याच्या व्यवस्थेने प्रामाणिकपणे आणि प्राणपणाने झटलं पाहिजे. आपलं अस्तित्व निरोगी, चिंतारहीत, आनंदी व्हावं यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले तर जन्म आणि मृत्यू यामधलं सगळ्यांचंच जगणं सुखी होईल, सुंदर होईल! हा शोध महत्वाचा शोध आहे. त्याप्रमाणे काम करणं, त्यासाठी झटणं हेच बौद्ध विचारधारेचं सौंदर्यशास्त्र आहे. या सौंदर्यशास्त्रात जन्मामुळे अस्तित्व आकाराला येतं म्हणून त्याला सुंदर म्हटलंय, असं नाही. मृत्यूमुळे जीवन संपतं म्हणून त्याबद्दल कटुताही नाही, त्रागा नाही, कलुषित भावना नाही. मृत्यूला सुंदर ठरवणं ही मानवी मनाची सर्वोच्च सुंदरता आहे. अर्थात खून, युद्धातली हिंसा यांचा धिक्कार बौद्ध विचारधारा करतेच. अशा प्रसंगातून झालेले मृत्यू हे कुरूप मृत्यू आहेत. आत्ताचे कोरोनामुळे झालेले मृत्यूही कुरूप आणि वेदनादायी आहेत. असे मृत्यू टाळण्यासाठी व्यक्ती, समाज आणि सरकारी यंत्रणा यांनी प्रयत्न केलेच पाहिजेत.

मृत्यूच्या जातक कथा

जिवलग व्यक्तीचा मृत्यू झाला की माणसं शोकात बुडून जातात. रात्रंदिवस शोक करत बसतात. अन्नपाण्याचा त्याग करतात किंवा जेवणाची अबाळ करून शरीराला कष्ट देतात. हे करणं पूर्णपणे निष्फळ आहे, असं बौद्ध धम्म बजावतो. तथागत बुद्धांनी मृत्यूनंतरचा शोक हा जन्म आणि मृत्यूच्या अज्ञानातून निपजतो, असं निःसंदिग्धपणे सांगितलंय.

बुद्धांचं परिनिर्वाण होणार आहे हे कळताच भन्ते आनंद अत्यंत दुःखी होतात. त्यावेळी बुद्ध आनंदाजवळ आपली नाराजी व्यक्त करतात आणि वर सांगितलेली भावना व्यक्त करतात. जिथं जन्म आहे तिथं परिनिर्वाण असणारच, असं मार्गदर्शन करतात. याच भावनांचा पुनरुच्चार करणाऱ्या अनेक जातक कथा बौद्ध साहित्यात उपलब्ध आहेत. 'गेलेल्यांचा शोक व्यर्थ आहे' हा संदेश देणारे 'मतरोदक जातक' असो. शोकापासून निवृत्त करणारे उपाय सांगणारे सुजात जातक असो. तसंच 'प्राण खर्ची घालून अनुयायांना सुखी करावं' म्हणजेच प्रसंगी मृत्यू पत्करून जबाबदार व्यक्तीनं लोकांचं मरण थोपवलं पाहिजे, त्यांना सुखी केलं पाहिजे, हा संदेश देणारे 'महाकपी जातक' असो ही काही कथांची प्रातिनिधिक उदाहरणं आहेत.

# शंभर कुटुंबियांना पुरविला अन्नाचा घास

## श्री स्वामी समर्थ केंद्रातर्फे किराणा किटचे वाटप

▶ प्रतिनिधी

माजलगाव : श्री स्वामी समर्थ सेवा मार्गात अध्यात्मा बरोबरच संस्कार, संस्कृती, सामाजिक बांधिलकी जोपासली जाते. कोरोना संसर्गाच्या काळात गरजू कुटुंबांना मदतीचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन पोलिस निरीक्षक धनंजय फराटे यांनी केले. श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात परमपूज्य गुरूमाऊलींच्या आशीर्वादाने शंभर गरजू कुटुंबांना गुरुवारी केंद्रातील सेवेकरी यांच्या वतीने किराणा किटचे वितरण करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून फराटे बोलत होते.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेश साबळे उपस्थित होते. सुरुवातीला श्री स्वामी समर्थांची पोलीस निरीक्षक फराटे यांच्या हस्ते आरती करण्यात आली. यानंतर केंद्रातील सेवेकरी आणि मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. पुढे बोलताना धनंजय फराटे म्हणाले, श्री स्वामी समर्थ सेवा मार्गात अध्यात्मा बरोबरच सामाजिक बांधिलकी जोपासली जाते. तसेच भारतीय संस्कृतीचे दर्शन व रक्षण प्रत्येक केंद्रात घडते, अशा प्रकारे सामाजिक जाणिवेतून केंद्राने घेतलेल्या या उपक्रमाबद्दल त्यांनी सर्व सेवेकऱ्यांचे अभिनंदन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्रातील महीला, तरूण, नागरिक सर्व सेवेकरी यांनी परिश्रम घेतले.



# ट्रॉमा केअर सेंटरला संजीवनी

## तेलगाव येथे शासकीय कोविड हॉस्पिटल कार्यान्वित

▶ प्रतिनिधी

माजलगाव : गेल्या कित्येक वर्षापासून सुविधाविना बंद असलेले तेलगाव येथील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये शासकीय कोविड हॉस्पिटल सुरू केले आहे. आता हे हॉस्पिटल कोणत्याही कारणाने बंद पडू देणार नाही, अशी ग्वाही आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली.

तेलगाव येथे शासकीय कोविड हॉस्पिटलच्या उद्घाटनप्रसंगी आमदार प्रकाश सोळंके बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुर्यकांत गित्ते, वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरेश साबळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.मधुर घुबडे, ट्रॉमा केअर सेंटर



येथील डॉ.कट्टे, डॉ.लगड, डॉ. आळणे, सह स्टाफनर्स आंबट, मेघा जाधव, मिसाळ उपस्थित होते. या हॉस्पिटलमध्ये ऑक्सिजन सुविधा असलेले ४० बेड उपलब्ध करून दिलेले आहेत. जिल्हा रूग्णालय बीड येथून सर्व आवश्यक औषधी, व सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मुळे फक्त तेलगावच नाही तर वडवणी, धारूर, माजलगाव, तसेच सिरसाळापर्यतच्या रूग्णाची होणारी धावपळ, गैरसोय कमी होणार आहे. येथील रूग्णांना ऑक्सिजन, रेमडेसिवर इंजेक्शनची कमतरता भासू देणार नाही. गरज पडल्यास ऑक्सिजनचे ३० सिलिंडर तेलगाव साखर कारखान्यातून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

# दिंद्रुडचे अफलातून नेतृत्व हरपले सदाशिवअप्पा शेटे अनंतात विलीन

▶ प्रतिनिधी

दिंद्रुड : येथील प्रसिद्ध व्यापारी



सदाशिव बेलाप्पा शेटे (वय ८० वर्षे) यांचे सकाळी हिपॅटिक कोमा, हृदय विकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी दिंद्रुड येथील शेटे फार्महाऊस परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुडचे भूमिपुत्र व महाराष्ट्र राज्याला मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून आरोग्य सेवा देणारे ओमप्रकाश शेटे, आयुष मंत्रालय भारत सरकारचे तज्ञ संचालक तथा शिवव्याख्याते डॉ.शिवरत्न शेटे, अ‍ॅड.किर्तीकुमार शेटे या कर्तृत्ववान मुलांचे जन्मदाते सदाशिवअप्पा शेटे मागील काही दिवसांपासून लिव्हरच्या आजाराने ग्रस्त होते.

त्यांच्यावर लातूर येथील स्वामी विवेकानंद हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. डॉक्टरांनी प्रयत्नांची शिकस्त केली मात्र त्यास यश आले नाही. त्यांची शुक्रवारी सकाळी प्राणज्योत मालवली. कुठल्याही क्षेत्रात मनापासून आवड असणारे शेटे आण्णा हे हुरहुन्नरी व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. बालपणीच त्यांचे वडिलांचे छत्र हरवले होते. मात्र परिस्थितीशी संघर्ष करत व्यापारात त्यांनी नावलौकिक मिळवला. किराणा, ट्रेडर्स, बीज भांडार, सराफा व्यवसायात त्यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. प्रचंड हजरजवाबीपणा हा त्यांचा स्थायी भाव. व्यावसायिक क्षेत्रासोबतच कलेची आवड असलेल्या शेटे यांनी वयाच्या ६० व्या वर्षात त्यांनी अनेक चित्रपट व मालिकांत भूमिका निभावल्या. वयाच्या ८० व्या वर्षीही त्यांच्यातील उत्साह हा तरुणांना लाजवेल असा होता. त्यांच्या अचानक जाण्याने पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, वर्तमानच्या वतीने मुख्य संपादक भगीरथ तोडकरी, ज्येष्ठ पत्रकार बाबा श्रीहरी देशमाने यांनी सदाशिवअप्पा शेटे यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

### फडणवीस, मुंडेंकडून शेटे कुटुंबियांचे सांत्वन

ओमप्रकाश शेटे यांच्या वडिलांचे निधन झाल्याचे समजताच राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री बबनराव लोणीकर, काडसिद्धेश्वर स्वामी (कोल्हापूर), भाजपचे जेष्ठ नेते श्रीकांत भारतीय, आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार मोहनराव फड, भगीरथ बियाणी आदींनी फोनवरून शेटे परिवाराचे सांत्वन केले.

# 'स्वत धान्यातील वाटपात गैरव्यवहार चालणार नाही'

## आमदार प्रकाश सोळंकेंनी अधिकारी, कर्मचारी धरले धारेवर

▶ प्रतिनिधी

माजलगाव : स्वस्त धान्य वाटपातील गैरव्यवहार रोखण्यासाठी उपाययोजना करा, अशा स्पष्ट सूचना आढावा बैठकीत आमदार प्रकाश सोळंके यांनी संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिल्या. दरम्यान, कोरोना बाबतही अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कर्तव्यात कसूर करू नये, याबाबतही संबंधितांना आमदार सोळंके यांनी धारेवर धरले.

येथील तहसिल कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या आढावा बैठकीला आमदार प्रकाश सोळंके यांच्यासह बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग सोळंके, समाजकल्याण सभापती कल्याण आबूज, पं.स.सभापती भागवतराव खुळे, उपसभापती डॉ.वसिम मनसबदार, पं.स.सदस्य शशांक सोळंके, जयदत्त नरवडे, नगरसेवक भागवतराव भोसले, उपविभागीय अधिकारी नम्रता चाटे, वैद्यकीय अधिक्षक डॉ.सुरेश साबळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.मधुकर घुबडे, गटविकास अधिकारी प्रज्ञा माने आणि कर्मचारी आदी उपस्थित होते. आमदार सोळंके म्हणाले, कोरोना काळात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी रूग्णांच्या हितासाठी प्रयत्न करावेत. शासकीय रूग्णालयातील उपचार पध्दती आणि सेवा याचे कौतुक करतानाच खाजगी रूग्णालयांनी कोविड बाबत दर्जेदार सेवा पुरविण्याची गरज आहे. काही खाजगी रूग्णालये भरमसाठ बिले आकारत असल्याचेही निदर्शनास आल्याचे सोळंके म्हणाले. खाजगी रूग्णालयातील बीलांचे ऑडीट होणे गरजेचे आहे. याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले. संजय गांधी, श्रावणबाळ निराधार योजनेंतर्गत मिळणारे मानधन वेळेवर लाभार्थींना मिळत नाही. काही ठिकाणी बँकेत रक्कम वर्ग झाल्यानंतर बँक कर्मचारी उदासीनपणा दाखवून अडथळा आणत आहेत, याबाबतही संबंधितांना धारेवर धरत या योजनेमध्ये सुसूत्रता आणण्याची गरज असल्याचे सोळंके म्हणाले.



### ...तर दोषींवर कडक कारवाई करणार

स्वस्त धान्य दुकानदारांनी आपापल्या गावांत ग्राम दक्षता समितीसमोर स्वस्त धान्य वाटप करून त्याचा अहवाल वरिष्ठांना पाठविणे अनिवार्य आहे, याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना अक्षरशः झापले. संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वस्त धान्य वाटपात कुचराई केली तर दोषींवर कडक कारवाई करू असेही निर्देश आमदार प्रकाश सोळंके यांनी दिले.

दिंद्रुड पोलीसांची लक्तरे वेशीला

# मुलीच्या तपासासाठी मागितले ४० हजार रुपये

▶ प्रतिनिधी

दिंद्रुड : अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाली, तिचे अपहरण करण्यात आले असून तिचा शोध घेण्यासाठी दिंद्रुड पोलिसांनी चाळीस हजार रूपये मागितल्याची तक्रार मुलीच्या वडिलांनी पोलीस अधीक्षकांकडे केली आहे. फिर्यादीकडे पैशाची मागणी करणाऱ्या पोलिसांच्या मध्यस्थीचे कॉल रेकॉर्डिंग समोर आल्याने खळबळ उडाली. पैसे मागितल्याचा पोलिसांनी मात्र इन्कार केला. सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल गव्हाणकर व पोलिसांचा मध्यस्थ हनुमान फपाळ या दोघांचा तक्रारीत उल्लेख आहे.

माजलगाव तालुक्यातील बेलुरा येथील १७ वर्षाची मुलगी बेपत्ता झाली. दि.२५ एप्रिल रोजी तिच्या पालकांनी दिंद्रुड पोलीस ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांचा मध्यस्थ हनुमान याने मुलीचा तपास लावून परत आणायचे असेल तर साहेबाला चाळीस हजार रूपये खर्च द्यावा लागेल, असे सांगितले. जुळवाजुळव करून मुलीच्या वडिलांनी पंधरा हजार रूपये हनुमानकडे दिले. पाच दिवस झाले तरी तपास लागला नव्हता. त्यामुळे मुलीच्या वडिलांनी ठाण्यात चौकशी केली. परंतु त्यांना प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर मध्यस्थी हनुमानला विचारणा केली असता, राहिलेले पंचवीस हजार रूपये दिल्याशिवाय तपास लागू शकत नाही, असे त्याने सांगितले. त्यामुळे मुलीच्या वडिलांनी पोलीस अधीक्षक कार्यालय गाठून याबाबत तक्रार दाखल केली. बेपत्ता मुलीचा तपास लावावा व पोलीस मध्यस्थ सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल गव्हाणकर यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी यात केली आहे.

### 'तपास प्रगतीपथावर'

तपास सुरू असून, दिंद्रुड पोलिसांनी कुणालाही याप्रकरणी पैशाची मागणी केलेली नाही. आम्ही तपासात यश मिळविले आहे. मात्र, काही कायदेशीर बाबींमुळे उशीर होत आहे. लवकरात लवकर या प्रकरणाचा छडा लावणार आहोत, असे दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल गव्हाणकर यांनी सांगितले.

# माजलगावात 'मंजूर' घरकुलांची कामे बंद

## नगराध्यक्ष शेख लक्ष देतील काय?; लाभार्थ्यांसमोर आर्थिक अडचणी

▶ प्रतिनिधी



माजलगाव : येथील नगर परिषदेच्या वतीने पंतप्रधान आवास योजनेत मंजूर घरकुलांचे काम तिसरा हप्ता न मिळाल्याने थांबले असून, त्यामुळे घरकुलधारक त्रस्त झाले आहेत. किराया कसा भरायचा, असा प्रश्न त्यांना पडला आहे. दरम्यान, मंजूर घरकुलांची कामे रखडल्याने नागरिक आश्चर्य व्यक्त करीत आहेत. या गंभीर प्रश्नाकडे नगराध्यक्ष शेख मंजूर लक्ष देतील काय? असा सवाल नागरिक विचारत आहेत.

पंतप्रधान आवास योजनेत येथील नगर परिषदेअंतर्गत एकूण एक हजार दोनशे जणांना घरकुल मंजूर झाले आहेत. घरकुलांचे काम शेवटच्या टप्प्यात असताना पैशाअभावी कामे थांबली आहेत. गवंड्यांची मजुरी, सिमेंट-स्टील दुकानदारांची देणी थकल्याने लाभार्थी त्रस्त झाले आहेत. नगर परिषदेने याबाबत तातडीने दखल घेऊन थकलेले हप्ते द्यावेत, अशी मागणी होत आहे.

दरम्यान, लाभार्थ्यांनी आपल्या घरकुलांचे बांधकाम करण्यासाठी राहते घर सोडून किरायाच्या घरात बस्तान मांडल आहे. या योजनेचा राज्य सरकारचा दुसरा हप्ता व केंद्र सरकारचा तिसरा व चौथा हप्ता अद्याप मिळालेला नाही. पहिल्या हप्त्याच्या आलेल्या निधीतून दुसरा हप्ता आम्ही दिलेला आहे. याबाबत आमचा पाठपुरावा सुरू असून, लवकरच निधी उपलब्ध होईल, असे मुख्याधिकारी विशाल भोसले यांनी सांगितले. प्रशासनाकडून पाठपुरावा सुरु असल्याचे सांगितले जात असले तरी निधी मिळण्यास विलंब होत आहे.

### वाढदिवस अभिष्टचिंतन!



माजलगाव : येथील सामाजिक कार्यकर्ते सिध्दु येवले यांचा वाढदिवसानिमित्त गौरव करताना पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले, कॉ.शिवाजी कुरे, अ‍ॅड.इंद्रजित शिंदे, सचिन टाक.

# अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहानी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : फुलपिंपळगाव येथील विजय मते आणि पत्नी अश्विनी धोपटे यांचा गेल्या वर्षी लॉकडाऊन काळात विवाह झाला होता. गेल्या २८ मे रोजी अश्विनीचे एका खाजगी रूग्णालयात उपचारा दरम्यान निधन झाले. दरम्यान, विजय आणि अश्विनीने एक वर्ष सुखा समाधानाची काढली. मात्र अश्विनीच्या अकाली जाण्याने 'अर्ध्यावरती डाव मोडला, अधुरी एक कहानी' या गाण्याची प्रचीती आली.

गेल्या वर्षी ८ मे रोजी विजय आणि अश्विनीचा विवाह माजलगाव येथे पार पडला होता. विजय आणि अश्विनीचा संसार सुखासमाधानाने सुरू होता. या दोघांच्या संसाररूपी



वेलीला फूल उमलावे तसे अश्विनी गरोदर राहिल्या मात्र नियतीच्या मनात वेगळेच होते. प्रसूतीवेळी अश्विनी आणि होणाऱ्या मुलीचा करूण अंत झाला. अश्विनीच्या निधनामुळे परिसरात आणि नातेवाईकां मध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. अश्विनी या मितभाषी आणि सुस्वभावाच्या म्हणून परिचित होत्या. गायक अरूण दाते यांच्या भातुकलीच्या खेळामधल्या राजा आणि राणी सारखे अश्विनी आणि विजय यांची कहानी झाली आहे.

# प्रभाग १० मध्ये रस्ते की गटारगंगा?

## रहिवाशी झाले त्रस्त; नगरपालिकेविरोधात होतोय रोजच शिमगा

▶ प्रतिनिधी

माजलगाव : प्रभाग दहामध्ये जागोजागी नाल्या तुंबल्या असून, सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. नागरिकांना रस्त्यावरून चालणे मुश्कील झाले आहे. नगरपालिकेने स्वच्छतेचे टेंडर दिले असताना नगरपालिका व नगरसेवकांच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. दरम्यान, प्रभाग दहामधील रस्ते गटारगंगा झाली असून याबाबत नागरिक नगरपालिका प्रशासना विरोधात 'शिमगा' करत आहेत.





माजलगाव शहरातील प्रभाग दहामध्ये पाटील गल्लीचा काही भाग, जुना तहसिल रोड, भटगल्ली, मठगल्लीचा काही भाग, मस्जिद चौक, जुजगर गल्ली, चाऊस गल्ली, जुना डाक बंगला आदी भाग येतो. या ठिकाणी दोन नगरसेवकांना निवडून द्यायचे होते. निवडून आलेल्यांमध्ये एक नगरसेवक भाजपचा, तर एक नगरसेवक राष्ट्रवादीचा निवडून आलेला आहे. या प्रभागात मागील अनेक दिवसांपासून काही ठिकाणे वगळता स्वच्छताच केली जात नसल्याने जागोजागी कचऱ्याचे ढिगारे साचलेले असून, त्या ठिकाणी जनावरे येऊन हा कचरा पांगवत असतात. या भागातील नाल्या तर कित्येक महिन्यांपासून स्वच्छ केल्याच नसल्याने व या भागातील घरे खाली असल्याने अनेकांच्या घरात घाण पाणी जाते. हेच घाण पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने या प्रभागात डासांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव दिसून येतो. यामुळे आमच्या आरोग्याशी नगरपालिका व नगरसेवक खेळत असल्याचा आरोप या भागातील नागरिक करताना दिसत आहेत. या दोन्ही नगरसेवकांत ताळमेळ नसल्याने आमच्या प्रभागाकडे कोणाचेच लक्ष नसल्याचा आरोप देखील या भागातील नागरिक करताना दिसत आहेत. या प्रभागात तात्काळ स्वच्छता व नालेसफाई न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा देखील या प्रभागातील नागरिकांनी दिला आहे. नगरपालिकेने करोडो रूपये खर्च करून स्वच्छतेचे टेंडर दिले असताना टेंडर चालकाच्या मनमानीमुळे शहरातील अनेक भागात स्वच्छताच होत नसल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे.



# अफलातून, अजातशत्रू व्यक्तिमत्त्व

**बीड जिल्ह्याच्या राजकारणात रमेश सोळंके यांचे व्यक्तिमत्त्व अफलातून आहे. सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात रमेश सोळंके यांचा सक्रीय सहभाग आहे. माजलगाव तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्षस्थान भूषवणारे रमेश सोळंके एक अजातशत्रू व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा १ जून हा वाढदिवस या वाढदिवसाच्या निमित्ताने रमेश सोळंके ऊर्फ बप्पा यांच्या जीवन कार्यावर टाकलेला फोकस.**

निमित्त

**भगीरथ तोडकरी**

माजलगाव तालुक्यातील सादोळा या गावात शेतकरी कुटूंबात वाढलेले रमेश आसाराम सोळंके ऊर्फ बप्पा यांना आज संपूर्ण बीड जिल्हा एक युवा नेते आणि सामाजिक बांधीलकी जपणारे नेतृत्व म्हणून ओळखत आहेत. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी व पाठिंबा नसताना रमेश बप्पा हे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करून कार्यरत आहेत. विद्यार्थी दशेपासूनच समाजसेवेचे बाळकडू त्यांना मिळालेले आहे,

संकल्पनेतून रमेशबप्पा यांनी उपेक्षित, वंचित घटकांच्या अडी-अडचणी सोडवण्यावर भर दिला. याच अनुभवाच्या जोरावर आजतागत त्यांचे समाजकार्य सुरुच आहे. व्यवसायाने इलेक्ट्रीकल कॉन्ट्रक्टर असलेले रमेशबप्पा आय.टी.आय. झाले आहेत. त्यांचे आजोबा रामराव सोळंके यांच्या सकारात्मक विचारातून आपण घडलो अशी प्रांजळ कबुली रमेशबप्पा आवर्जून देतात. रमेशबप्पांनी सादोळा गावातील मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी वेळोवेळी प्रयत्न केलेले आहेत. आजचा युवावर्ग व्यसनाच्या आहारी जात आहे. यावर रमेशबप्पा खंत व्यक्त करतात. अशा मुलांना विकासाच्या वाटेवर कसे आणता येईल, हा विचार रमेशबप्पांच्या मनात सतत असतो. राजकारणाचा पुरेपूर वापर गोरगरिबांच्या कल्याणासाठी झाला पाहिजे, असा अट्टहास रमेशबप्पांना असतो. म्हणून बप्पा हे इतर राजकारण्यांपेक्षा निश्चित वेगळे ठरतात. गावत गरिब मुली-बाळींचे लग्न असो की इतर प्रश्न रमेशबप्पा हे अडीअडचणी सोडविण्यासाठी धावून जातात. महापुरुषांच्या जयंत्या, गणेशोत्सव, नवरात्रोत्सोव, अखंड हरिनाम सप्ताह या सर्व समाजोपयोगी कार्याला रमेशबप्पांचा हातभार लागलेला असतो. विशेष म्हणून बप्पा केलेल्या सहकार्याचा कधीच गवगवा करत नाहीत.

आपल्या व्यवसायातील काही हिस्सा ते समाजकार्यासाठी खर्च करत आहेत. एक वेगळा युवानेता, एकवेगळे नेतृत्व म्हणून आज संपूर्ण जिल्हा रमेशबप्पांकडे पहात आहे. अतिशय मितभाषी असलेले रमेशबप्पा लोकांच्या कल्याणासाठी झटत आहेत. त्यांनी सामाजिक कार्याबरोबरच धार्मिक क्षेत्रातही भरीव कार्य केले आहे. त्यांनी नव्या पिढीला व्यसनापासून दूर राहण्याचा संदेश दिला आहे. त्यामुळे केवळ भपकेबाजपणा न करता कृतीला जोड देणारे रमेशबप्पा सादोळा गावासाठी भूषण आहेत. म्हणून प्रत्येक सादोळकरांना त्यांचा सार्थ अभिमान वाटतो.

या उक्तीप्रमाणे सादोळ्याचे भूमिपुत्र तथा उद्याचे आश्वासक भावी नेतृत्व रमेशबप्पा सोळंके यांचे व्यक्तीमत्व आहे. अनाथ, दीन-दुबळ्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो. या भावनेतून रमेशबप्पा काम करत असतात. गोरगरीब जनतेच्या कल्याणाचा वसा घेत रमेशबप्पांचे काम अविरतपणे सुरू आहे. प्रसिद्धीचा हव्यास नाही की, ना पुढे पुढे करण्याची वृत्ती. आपला स्वाभिमानी बाणा जपत अतिशय तळमळीने सामाजिक क्षेत्रात काम करणारा हा योध्दा प्रत्येकांची सुख-दुःखे जाणून पुढे जात आहे. रस्त्यावरचा हताश माणूस विकासाच्या प्रवाहात आला पाहिजे, हा ध्यास घेवून रमेशबप्पा वावरत आहेत. त्यांना कसलीही राजकीय मनिषा नाही. अगदी निस्वार्थ भावनेने रमेशबप्पा सामाजिक व धार्मिक क्षितीजावर जोमाने झळकत आहेत.



## आमदार प्रकाश सोळंके सांगतील तीच पूर्वदिशा

वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या राजकीय भवितव्यावर बोलताना रमेश सोळंके म्हणाले, माझा पक्ष, माझा नेता, माझे ध्येय, माझा संकल्प, माझा वादा केवळ आणि केवळ आमदार प्रकाशदादा सोळंके आहेत. आमदार सोळंके सांगतील तीच माझ्या राजकारणाची पूर्वदिशा असेल, असेही स्पष्टीकरण रमेश सोळंके यांनी वर्तमानशी बोलताना दिली.

## रमेश सोळंके यांचे कार्य उल्लेखनीय : आमदार प्रकाश सोळंके

माजलगाव : राष्ट्रवादी काँग्रेसचे माजलगाव तालुकाध्यक्ष रमेश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. रमेश सोळंके यांचे कार्य उल्लेखनीय आहे, अशा शब्दांत आमदार सोळंके यांनी शुभेच्छा संदेश पाठविला आहे. आमदार प्रकाश सोळंके यांनी शुभेच्छा संदेशात म्हटले आहे की, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष रमेश सोळंके यांचा १ जून हा वाढदिवस असल्याने मनस्वी आनंद होत आहे. रमेश सोळंके यांनी सामाजिक बांधिलकीतुन केलेले कार्य कौतुकास्पद आहे. विविध क्षेत्रात त्यांनी अल्पावधीत आपल्या कार्यातून वेगळा ठसा उमटविला आहे. सादोळा सारख्या ग्रामीण भागातून येवून आज माजलगाव तालुका, जिल्ह्यात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. सामाजिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात रमेश सोळंके यांच्या हातून यापुढेही भरीव कार्य होवो याच वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा, अशा शब्दात आमदार सोळंके यांनी दिल्या आहेत.




आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.